<u>**निशाणी क्र. ६९ वरील आदेश**</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने त्याचेविरुध्द दिनांक २१/१०/२०१५ इ. रोजी झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्याच्या म्हणण्यानुसार त्यास त्याचे आईच्या आजारपणामुळे व कार्यालयातून मागणी केलेली कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने त्यास वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. प्रस्तुत प्रतिवादीने जाणीवपुर्वक विलंब केला नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायपूर्ततेच्या दृष्टीने त्याचेविरुध्द झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत स्विकारण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

३. वादी याने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तीक नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रतिवादी क्र. १ याने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन प्रस्तुत प्रतिवादीच्या अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने प्रस्तुतचा दावा हक्क ठराव घोषणेसाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असलेले वादाचे निराकरण याच दाव्याचेकामी होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १ यास दाव्यास कैफियत सादर करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ याने वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी

खालील आदेश पारीत करीत आहे :

**— <u>आदेश</u> —**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यास कैफियत दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. १ याने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ४००/— दयावी. त्यापैकी त्याने रक्कम रुपये २००/— वादीस दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/— सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड ( गि. सु. माने )
दिनांक : १५/०२/२०१७ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.